सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us

E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - १६७ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. ७ ऑगस्ट २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

# ५२९ कोटींची पहिली कर्जमाफी खात्यात

## ६.२२ लाख शेतकऱ्यांना दिलासा; आधार प्रमाणीकरण होताच पैसे जमा होणार

## मुख्यमंत्री फडणवीसांची मोठी घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७मुंबई**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेअंतर्गत आषाढी एकादशीला घोषित करण्यात आलेल्या पहिल्या यादीतील ६ लाख २२ हजार शेतकऱ्यांच्या खात्यात आज जवळपास ५ हजार २९ कोटी रुपयांचा पहिला हप्ता जमा करण्यात आला आहे. आधार ऑथेंटिकेशन पूर्ण केलेल्या सर्व शेतकऱ्यांचे कर्जखाते आता 'नील' (नशी) झाले आहे, अशी महत्त्वपूर्ण माहिती राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज माध्यमांशी बोलताना दिली. मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत फडणवीस यांनी कर्जमाफी योजना, नाशिकमधील रस्ते आणि कुंभमेळ्याची कामे, तसेच राज्यातील इतर राजकीय आणि सुरक्षाविषयक घडामोडींवर सविस्तर भाष्य केले.

फडणवीस म्हणाले, शेतकऱ्यांनी कर्जमाफीसाठी कोणताही अर्ज करण्याची गरज नाही. ग्रामपंचायतींना पाठवलेल्या यादीनुसार शेतकऱ्यांनी फक्त आपला आधार क्रमांक बँक खात्याशी लिंक करून ऑथेंटिकेट करायचा आहे. मध्यंतरी बँकांनी आकारलेल्या एनपीए (छझ-) वरील अतिरिक्त व्याजामुळे कर्ज जास्त दिसत होते. मात्र, शासनाच्या सूचनेनुसार बँकांनी ते अतिरिक्त व्याज रद्द केले आहे. त्यामुळे शासनाने भरलेली रक्कम आणि शेतकऱ्यांच्या खात्यातील कर्जाची रक्कम समान झाल्याने खाती पूर्णपणे नील झाली आहेत. सध्या १८-१९ लाख खात्यांची प्रक्रिया सुरू असून, १२ लाख खात्यांमध्ये काही तांत्रिक त्रुटी, नावांमधील तफावत किंवा दुबार नोंदणी असल्यामुळे ती बँकांकडे दुरुस्तीसाठी परत पाठवली



आहेत. बँकांनी एका आठवड्यात ती दुरुस्त करून देण्याचे आश्वासन दिले आहे. जसे शेतकऱ्यांचे आधार ऑथेंटिकेशन होईल, तसे टप्प्याटप्प्याने कर्जमाफीचे पैसे जमा होतील. तसेच, या योजनेत कोणतेही ओटीएस (जढड) नसल्यामुळे शेतकऱ्यांना 'सिबिल'ची (उखइखङ) कोणतीही अट लागणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दुसरीकडे, सरसंघचालक मोहन भागवत यांच्या नुकत्याच आलेल्या विधानावर (जेन झी आंदोलन आणि सरकारला फटकारणे) फडणवीस यांनी अत्यंत सूचक प्रतिक्रिया दिली. सरसंघचालक जे बोलतात, ते एखाद्या विशिष्ट पक्षासाठी किंवा संस्थेसाठी नसून संपूर्ण देशाच्या हितासाठी असते.

### प्रशांत किशोर आणि मोहन भागवतांच्या विधानांवर प्रतिक्रिया


राष्ट्रवादी काँग्रेसने (सुनेत्रा पवार गट) प्रशांत किशोर यांना राजकीय सल्लागार नेमल्याच्या प्रश्नावर फडणवीस म्हणाले, त्यांनी अधिकृतपणे कोणाला सल्लागार नेमले आहे, याची माहिती आम्हाला अद्याप दिलेली नाही. जोपर्यंत ते आम्हाला अधिकृतपणे कळवत नाहीत, तोपर्यंत मी यावर बोलणे योग्य नाही. तो त्यांच्या पक्षाचा अंतर्गत विषय आहे.

## सैन्यदलातील जवानाने सात महिन्यांच्या गर्भवती पत्नीला संपवलं, वाशिम जिल्ह्यात खळबळ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७वाशिम**

वाशिम जिल्ह्यात एक धक्कादायक घटना घडली आहे. सैन्यदलात असणाऱ्या लष्कर जवानाने आपल्या ७ महिन्यांच्या गर्भवती पत्नीची हत्या केली घटना समोर आली आहे. या घटनेनं वाशिम जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी मृत महिलेच्या भावाच्या फिर्यादीवरून हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पतीसह सासु सासऱ्यांना पोलिसांनी अटक केली आहे.

कारंजामधील शिवनगर येथे भारतीय सैन्यात कार्यरत असलेल्या लष्कर जवानाने आपल्या सात महिन्याची गर्भवती असलेल्या पत्नीची हत्या केल्याची घटना घडली आहे. यामुळं वाशिम जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. मृत महिलेच्या भावाच्या फिर्यादीवरुन या प्रकरणी खुणाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून सैन्याच्या ६ व्या मराठा बटालियनमध्ये कार्यरत असलेला २८ वर्षीय पती ज्ञानेश्वर मदने आणि त्याच्या आईवडिलांना पोलिसांनी अटक केली आहे. महिलेच्या भावाने दिलेल्या फिर्यादी नुसार, काल दुपारच्या दरम्यान ज्ञानेश्वर मदने



यांनी फोन कॉलद्वारे माहिती देत सांगितले की, मृत दिपाली घरातील काम करत असताना पडल्यानं तिला रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. मृत महिला दीपालीचा भाऊ आणि आईवडीलांना माहिती मिळताच मध्यप्रदेशच्या बुऱ्हाणपूर येथून कारंजा इथं आले तेव्हा दीपाली त्यांना मृत अवस्थेत आढळून आली. महिलेचा भाऊ राहुल माने यानं आरोप करत सांगितले की, ज्ञानेश्वर मदने याचे दुसऱ्या महिलेशी अनैतिक संबंध होते, त्यामुळं तो दीपालीचा छळ करत होता. काही महिन्यांपूर्वी या प्रकरणी दोन्ही कुटुंबांमध्ये समझोता बैठक झाली होती. परस्पर सामंजस्यानं हे प्रकरण मिटवण्यात आलं होतं. मात्र, अखेर दीपालीची हत्या करून सासरी मंडळीने पिच्छा सोडला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मृत दीपालीच्या गळ्यावर असलेल्या खुणा बघून त्यांना संशय आल्यानं हत्याच केल्याचं कळते, त्या वरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पुढील तपास सुरु आहे.

## मराठा समाजासाठी घेतलेले निर्णय बदलणार नाहीत

### कुणबी नोंदींबाबतचे गैरसमज दूर करू ;मनोज जरांगेंच्या आरोपांवर उदय सामंतांचे स्पष्टीकरण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७मुंबई**

कुणबी नोंदी रद्द करण्यासाठी पत्र काढण्यात आले असून, मराठ्यांच्या नोंदी कमी करण्याचा कट रचला जात आहे, असा आरोप मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी नुकताच केला होता. त्यांच्या या आरोपामुळे राज्यात पुन्हा एकदा आरक्षणाचा मुद्दा तापला असताना, राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी पत्रकार परिषद घेत यावर राज्य सरकारची आणि महायुतीची भूमिका स्पष्ट केली आहे. जरांगे पाटलांच्या आरोपांना उत्तर देताना सामंत यांनी स्पष्ट केले की, कुणबी प्रमाणपत्राबाबत जे काही गैरसमज निर्माण झाले आहेत, ते सरकार नक्की दूर करेल. मराठा समाजासाठी घेतलेले निर्णय कोणत्याही परिस्थितीत बदलले जाणार नाहीत

मनोज जरांगे यांनी उपस्थित केलेल्या कुणबी नोंदींच्या मुद्द्यावर बोलताना उदय सामंत म्हणाले, या संपूर्ण प्रकरणाबाबत मी चंद्रशेखर बावनकुळे यांच्याशीही सविस्तर चर्चा केली आहे. बावनकुळे यांनीही स्पष्ट केले आहे की, सध्या जे काही घडत आहे ते केवळ गैरसमजातून होत आहे. महायुती सरकारने मराठा समाजाप्रती जे निर्णय घेतले आहेत, ते बदलण्याचा सरकारचा कोणताही विचार नाही आणि तसे



होणारही नाही.

सोशल मीडियावर फिरणाऱ्या काही व्हिडिओंचा संदर्भ देत सामंत यांनी विरोधकांवरही निशाणा साधला. ते म्हणाले, काही व्हिडिओ पाहून तुम्हाला समजले असेल की काही लोक जाणीवपूर्वक उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबद्दल गैरसमज पसरवण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र, मराठा समाजाला दिलेले १० टक्के आरक्षण आणि कुणबी दाखल्यांबाबत घेतलेली भूमिका ही एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांनीच घेतली आहे, हे विसरता कामा नये.

मराठा समाजाला आश्वस्त करतानाच, ओबीसी समाजालाही सामंत यांनी शब्द दिला आहे. मराठा समाजाला न्याय देत असताना ओबीसी समाजावरही कोणताही अन्याय होणार नाही, ही महाराष्ट्र सरकारची पहिल्यापासूनची ठाम भूमिका आहे. जर गरज पडली, तर ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांच्याशीही सरकार सकारात्मक चर्चा करण्यास तयार आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

## खासदारांसह मोदींना भेटले उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

### ब्रेकफास्टमध्ये विकासकामांवर झाली चर्चा,

### 'जेन झी' आंदोलनावरही मांडली भूमिका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७नवी दिल्ली**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज राजधानी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची महत्त्वपूर्ण भेट घेतली. संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू असताना पार पडलेल्या या उच्चस्तरीय भेटीनंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधत चर्चेचा सविस्तर तपशील जाहीर केला. या भेटीदरम्यान महाराष्ट्रातील विकासकामे आणि पावसाच्या सद्य:स्थितीसोबतच शिवसेनेच्या खासदारांची पंतप्रधानांसोबत 'चाय पे चर्चा' झाली. तसेच, देशातील 'जेन झी' आंदोलन आणि विरोधकांच्या भूमिकेवर शिंदेंनी कडक शब्दांत समाचार घेतला.

विद्यार्थी, युवक हे देशाचे उद्याचे भविष्य आहे. त्यामुळे सरकार आणि पंतप्रधान मोदींनीही विद्यार्थ्यांचा सन्मान ठेवून निर्णय घेतले आहेत. मात्र अमित शाहांचा राजीनामा मागणे हे विरोधकांचे राजकारण आहे. अमित शाहांनी नक्षलवाद




संपवला म्हणून राजीनामा मागताय? कलम ३७० हटवला म्हणून राजीनामा मागताय? पाकिस्तानी दहशतवाद संपुष्टात आणला त्यासाठी राजीनामा मागताय का? असं सांगत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांवर टीका केली.

एकनाथ शिंदे पत्रकार परिषदेत म्हणाले की, अमित शाहांनी सहकाराचा मंत्र देत समृद्धी आणली. सर्वसामान्यांपर्यंत सहकाराचे जाळे पोहचवण्याचं काम अमित शाहांनी केले. विरोधकांनी सभागृहात येऊन चर्चा केली पाहिजे. विरोधी पक्षनेते म्हणून आंदोलन करण्याचा अधिकार आहे परंतु जंतर मंतरला आंदोलन न करता पंतप्रधान निवासस्थानाबाहेर आंदोलन करणे हे षडयंत्र होते. हा राजकीय स्टंट होता. आंदोलनात ज्यांनी लाठीचार्ज केला त्यांची चौकशी सुरू आहे असं पंतप्रधानांनी बोलल्या नंतरही अमित शाहांचा राजीनामा मागणे हे विरोधकांचे राजकारण आहे. अमित शाह सभागृहात बोलतील तेव्हा विरोधक पळून जातील. देशभक्ती काय हे अमित शाहांना इतरांनी शिकवण्याची गरज नाही अशा शब्दात शिंदेंनी राहुल गांधींसह विरोधकांवर निशाणा साधला. तसेच संसदेचे अधिवेशन सुरू आहे. चर्चा करायला सरकार तयार आहे परंतु विरोधक गोंधळ घालताहेत. २ आठवडे झाले तरी सभागृहात जशी चर्चा व्हायला हवी तशी चर्चा करण्यास विरोधकांना रस नाही. संसद भवन परिसरात राजकारण करायचे हेच विरोधकांना कळते. सभागृहात विरोधकांनी चर्चा केली पाहिजे. परंतु ते न करता केवळ राजकारण करायचे काम करत आहेत. जंतर मंतरवरील आंदोलनानंतर शिक्षणमंत्र्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा दिला. आंदोलन करणारे निघून गेले पण त्यांच्या आडून जे राजकारण करत होते. त्याचे आंदोलन अजून सुरू आहे. विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर पंतप्रधानांनी कठोर कार्यवाही केली. पेपरफुटीविरोधात अनेक निर्णय घेतले. टास्क फोर्स बनवली. दोषींना कठोर शिक्षेचा कायदा आणला. पंतप्रधान मोदी स्वत: युवकांशी संवाद साधताहेत असं एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

VIDARBHA YOUTH WELFARE SOCIETY'S
PROF RAM MEGHE COLLEGE OF ENGINEERING AND MANAGEMENT
NEW EXPRESS HIGHWAY, BADNERA, AMRAVATI
ESTD.2009
ACCREDITED WITH GRADE A+ CYCLE II
(An Autonomous Institute)
DTE CODE 1128 www.prmceam.ac.in
| B.Tech | M.Tech | MBA | Ph.D. |
ADMISSION (2026-27)

| CHOICE CODE | BRANCH |
|---|---|
| 112819110 | Civil Engineering |
| 112824210 | Computer Science & Engineering |
| 112824610 | Information Technology |
| 112891210 | Computer Science & Engg.(Data Science) |
| 112829310 | Electrical Engineering |
| 112837210 | Electronics & Telecommunication Engg. |
| 0112810110 | Master of Business Administration (MBA) |

Excellence in Education , Excellence in Placements
Total Placed 400+
Total Offers 700+
Heighest Package 9 Lac
Average Package 3.5 Lac
Total Companies Visited for Campus Placement 78
Total Internships 1000+
tcs | Deloitte. | aws | Google | SIEMENS
JUNIPER | zscaler | paloalto | MICROCHIP | Haier
CONTACT US
9860454899, 8087275248, 7875355888, 9975539499

## संपादकीय ......

# एआय अंधांना देणार नवी दृष्टी?

*कृत्रिम बुद्धिमत्ता, स्मार्ट इलेक्ट्रॉनिक्स आणि मेंदू-संगणक संवाद यांसारख्या नव्या तंत्रज्ञानामुळे दृष्टिदोष असलेल्या व्यक्तींसाठी स्वावलंबनाचे नवे क्षितिज खुले होत आहे. माहिती, शिक्षण, रोजगार आणि सुरक्षित हालचाल यांचा अर्थच बदलून टाकणाऱ्या या नवक्रांतीमुळे 'दृष्टी'ची व्याख्या पुढील काळात नव्याने लिहिली जाण्याची चिन्हे आहेत.*

*गेल्या दशकात इलेक्ट्रॉनिक्समध्ये अभूतपूर्व प्रगती झाली. पूर्वी मनगटावरील घड्याळ, खिशातील मोबाईल किंवा संगणकापुरते मर्यादित असलेले इलेक्ट्रॉनिक्स आता चष्मा, कानातील उपकरणे, कपडे, बूट आणि अगदी मानवी शरीरात बसविल्या जाणाऱ्या सूक्ष्म चिप्सपर्यंत पोहोचले आहे. पुढील दशकात 'एम्बेडेड इलेक्ट्रॉनिक्स' म्हणजे शरीरात सुरक्षितपणे बसविलेली बुद्धिमान उपकरणे आरोग्यसेवा आणि दिव्यांग सहाय्य यामध्ये मोठी क्रांती घडवतील, असे तज्ज्ञांचे मत आहे. आजचा स्मार्ट फोन केवळ संवादाचे साधन राहिलेला नाही. त्यातील कॅमेरा आणि कृत्रिम बुद्धिमत्ता मिळून तो एका बुद्धिमान सहायकाप्रमाणे काम करू शकतो. समोर कोणती वस्तू आहे, कोणता रंग आहे, कोणत्या दिशेने वाहन येत आहे, कोणती नोट हातात आहे, औषधाची बाटली कोणती आहे किंवा दुकानाच्या पाटीवर काय लिहिले आहे, हे काही क्षणांत सांगणे आज शक्य झाले आहे. पूर्वी अशा कामांसाठी स्वतंत्र आणि महागडी उपकरणे लागायची. आता ही सुविधा अनेक मोबाईलमध्ये उपलब्ध होत आहे. यापुढील पाऊल म्हणजे स्मार्ट चष्मे. या चष्म्यांमध्ये बसविलेले कॅमेरे, सूक्ष्म स्पीकर्स आणि कृत्रिम बुद्धिमत्ता सतत परिसराचे निरीक्षण करतात. वापरकर्ता रस्ता ओलांडत असेल, समोर जिना असेल, दार उघडे असेल किंवा एखादी व्यक्ती समोर उभी असेल, तर चष्मा आवाजाद्वारे तत्काळ सूचना देऊ शकतो. काही प्रणाली लिखित मजकूर वाचून दाखवतात, चेहऱ्यांची ओळख करून देतात आणि वस्तू शोधूनही देतात. त्यामुळे अंध व्यक्तींचा आत्मविश्वास आणि स्वावलंबन मोठ्या प्रमाणात वाढू लागले आहे.*

*ब्रेल लिपीचे महत्त्व आजही तितकेच आहे; मात्र आता इलेक्ट्रॉनिक किंवा रिफ्रेशेबल ब्रेल तंत्रज्ञानामुळे संपूर्ण ग्रंथालय एका छोट्याशा उपकरणात मावू लागले आहे. डिजिटल पुस्तक डाऊनलोड केले की, त्यातील अक्षरे स्पर्शाने जाणवणाऱ्या ब्रेल बिंदूंमध्ये क्षणार्धात रूपांतरित होतात. त्यामुळे जाडजूड ब्रेल पुस्तकांची आवश्यकता कमी होत असून ज्ञान अधिक वेगाने उपलब्ध होत आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेतील सर्वात मोठी क्रांती म्हणजे दृश्य समजून घेण्याची क्षमता. पूर्वी संगणक फक्त छायाचित्र पाहत होता. आज तो त्या छायाचित्राचा अर्थ समजू शकतो. उदाहरणार्थ, 'एका उद्यानात दोन मुले खेळत आहेत. त्यांच्या मागे झाडे आहेत आणि उजव्या बाजूला रिकामी बाकडी आहेत,' असे संपूर्ण दृश्य संगणक काही सेकंदांत वर्णन करू शकतो. ही क्षमता अंध व्यक्तींसाठी अत्यंत उपयुक्त ठरत आहे. सामाजिक माध्यमांवरील छायाचित्रे, वर्तमानपत्रातील चित्रे, नकाशे किंवा माहिती फलक आवाजाद्वारे समजणे शक्य होत आहे.*

*कॉन्टॅक्ट लेन्सवरही मोठ्या प्रमाणावर संशोधन सुरू आहे. भविष्यात अशा स्मार्ट लेन्स केवळ दृष्टीसाठीच नव्हे, तर डोळ्यांतील साखरेची पातळी, आरोग्य स्थिती, औषधांचा परिणाम आणि दृश्यविषयक माहिती यासाठी वापरल्या जाऊ शकतात. या तंत्रज्ञानाला अजून व्यावसायिक स्वरूप मिळण्यासाठी काही काळ लागणार असला, तरी त्याची दिशा निश्चित झाली आहे.मेंदू-संगणक संवाद हे आणखी एक महत्त्वाचे क्षेत्र आहे. मानवी मेंदूतील विद्युत संकेत समजून घेऊन संगणक त्यानुसार प्रतिसाद देऊ शकतो. काही संशोधन प्रकल्पांमध्ये मेंदूतील संकेतांच्या आधारे संगणक नियंत्रित करणे किंवा कृत्रिम अवयव हलविणे शक्य झाले आहे. भविष्यात याच तंत्रज्ञानाच्या साहाय्याने दृश्य माहिती थेट मेंदूपर्यंत पोहोचविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. हा प्रवास अजून प्रारंभिक अवस्थेत असला, तरी त्याचे परिणाम क्रांतिकारक ठरू शकतात. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ध्वनी तंत्रज्ञान यांची जोडही अंधांसाठी अत्यंत उपयुक्त ठरत आहे. आज आवाजावर आधारित सहायक केवळ प्रश्नांची उत्तरे देत नाहीत, तर पुस्तके वाचून दाखवतात, दस्तावेज समजावून सांगतात, प्रवासाचे नियोजन करतात, संदेश पाठवतात, भाषांतर करतात आणि अगदी सभोवतालच्या वातावरणाचे वर्णनही करतात. त्यामुळे माहितीची उपलब्धता अभूतपूर्व प्रमाणात वाढली आहे.*

*भारतातील आणखी एक महत्त्वाची प्रगती म्हणजे, भारतीय भाषांमधील कृत्रिम बुद्धिमत्ता. मराठी, हिंदी, तमिळ, बंगाली, गुजराती यांसारख्या भाषांमध्ये आवाज ओळखणे, मजकूर वाचून दाखवणे आणि भाषांतर करणे अधिक अचूक होत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील आणि मातृभाषेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी तंत्रज्ञान अधिक सुलभ बनत आहे. संशोधनाच्या पातळीवर आणखी मोठी क्रांती घडत आहे. रेटिनल इम्प्लांट, कृत्रिम नेत्रपटल, न्यूरल इंटरफेस आणि मेंदू-संगणक संवाद यांसारख्या तंत्रज्ञानावर जगभर संशोधन सुरू आहे. काही प्रयोगांमध्ये पूर्ण दृष्टी मिळाली नसली, तरी प्रकाश, हालचाल, मोठ्या वस्तू आणि दिशेचा अंदाज घेणे शक्य झाले आहे. पुढील दशकात या तंत्रज्ञानामुळे गंभीर दृष्टिदोष असलेल्या व्यक्तींनाही नवीन पर्याय उपलब्ध होण्याची शक्यता आहे. याहून पुढचे पाऊल म्हणजे कृत्रिम दृष्टी. जगभरातील संशोधक नेत्रपटल, दृक्चेतातंतू आणि मेंदू यांच्यामधील संवाद समजून घेण्याचा प्रयत्न करत आहेत. काही रुग्णांमध्ये नेत्रपटलावर किंवा मेंदूमध्ये बसविलेल्या सूक्ष्म इलेक्ट्रोडस्च्या साहाय्याने प्रकाशाचे संकेत निर्माण करण्यात यश मिळाले आहे. त्यातून स्पष्ट चित्र दिसत नसले, तरी प्रकाश, हालचाल, मोठ्या वस्तू आणि दिशेचा अंदाज घेणे शक्य होत आहे.*

# श्रावणानिमित्त शिवालयांमध्ये तयारीला सुरुवात

## रंगरंगोटी, स्वच्छतेसह भाविकांच्या रांगांसह, दर्शनासाठी नियोजन बैठकींमध्ये विचारविनिमय

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७ अमरावती**

गुरुवार १३ ऑगस्टपासून सण-उत्सवाचा महिना श्रावण सुरू होत असून, श्रावण म्हटले की, हिरवळीने नटलेली सृष्टी. यातच देवाधीदेव महादेव यांच्या पूजेचा महिना. यानिमित्त चारही श्रावण सोमवारी शहरातील मोठ्या शिवालयांमध्ये भाविकांची मोठी गर्दी उसळते. या गर्दीवर नियंत्रण ठेवत पुरुष व महिला भाविकांना भोलेनाथांचे सुरक्षितपणे दर्शन करता यावे, यासाठी आतापासूनच नियोजन बैठकांना सुरुवात झाली आहे.

या नियोजन बैठकांमध्ये सोमवारी कोणता प्रसाद भाविकांना द्यायचा यापासून कशाप्रकारे दर्शन रांगांची व्यवस्था करायची. पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र दर्शन रांगा ठेवायच्या. मंदिरात होणारी गर्दी बघता अस्वच्छता ही होणारच. त्यामुळे स्वच्छतेसाठी किती मनुष्यबळाची नियुक्ती करायची. निर्माल्य गोळा करण्याची व्यवस्था कशी ठेवायची, याबाबत सध्या मंदिर संस्थानांकडून निर्णय घेतले जात आहेत.

शहरात गडगडेश्वर, तपोवनेश्वर, कोंडेश्वर, पाताळेश्वर, भुतेश्वर तसेच अंबागेटच्या आत अनेक शिवालये आहेत. येथे



श्रावण महिन्यात विशेषत:सोमवारी दर्शनासाठी विशेष गर्दी असते. काही भाविक सहस्त्र तर काही १०८ बिल्वपत्र अर्पण करतात. याच कालावधीत ज्यांचे व्रत पूर्ण झाले त्या भाविकांद्वारे महाप्रसादाचेही आयोजन शिवालयातील सभागृहांमध्ये केले जाते. त्यामुळे श्रावण महिन्यात मोठ्या शिवालयांचा परिसर हा गर्दीने गजबजलेला दिसून येतो. काही भाविक अगदी लहान कावड यांत्रांचे तर काही विशाल कावड यात्रांचे आयोजन करीत असतात. या कावड यात्रा शिस्तीत कराव्यात, भाविकाची पूजा अपूर्ण राहू नये, यासाठी आधी मंदिरांमध्ये सुचना देण्याबाबत सर्वच संस्थानांनी सूचना फलकांवर नमूद करून ठेवले आहे.

त्याचप्रमाणे ज्या भाविकांना महाप्रसाद अर्पण करायचा आहे, त्यांनाही याबाबत काही दिवस आधी सूचना द्यावी लागणार आहे. जेणेकरून महाप्रसादाला येणारे भाविक तसेच दर्शनाला येणाऱ्या भाविकांची गर्दी वाढून गोंधळ होणार नाही.

कावड यात्रांसाठी विशेष व्यवस्था शहरातील मोठ्या शिवालयांमध्ये श्रावण महिन्यातील प्रत्येक सोमवारी अगदी वाजत गाजत ढोल, ताशे, आतषबाजीच्या गजरात विविध देखाव्यांसह देखण्या कावड यात्रा येत असतात. या कावड यात्रां अगदी शिवालयांपर्यंत व्यवस्थित पोहोचाव्यात म्हणून विशेष मार्गाचे नियोजन करण्यात आले असून कावड यात्रेतील मोजक्या भाविकांना कावडीसह तसेच इतर भाविकांना मात्र दर्शन रांगेतून प्रवेश दिला जाणार आहे.

# एसआयआरला पुन्हा मुदतवाढ: प्रारूप यादी आता २४ ऑगस्ट रोजी, बीएलओ १७ पर्यंत घेणार घरभेटी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अमरावती-** भारत निवडणूक आयोगाने १ ऑक्टोबर २०२६ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार यादीच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रमाला पुन्हा एकदा मुदतवाढ दिली आहे. सुधारित वेळापत्रकानुसार, आता १७ ऑगस्टपर्यंत मतदारांच्या गणना अर्जांची नोंदणी आणि डीजीटायझेशन केले जाईल, तर प्रारूप मतदार यादी २४ ऑगस्ट रोजी जाहीर होणार आहे.

निवडणूक आयोगाने जारी केलेल्या नवीन कार्यक्रमानुसार, बूथ लेव्हल अधिकारी (बीएलओ) यांच्यामार्फत घरोघरी भेटीचा कार्यक्रम १७ ऑगस्टपर्यंत सुरू राहील. हा कार्यक्रम ३० जून रोजी सुरू झाला होता. बीएलओच्या या कामातून मतदान केंद्रांचे तर्कसंगतीकरण आणि पुनर्रचना देखील १७ ऑगस्टपर्यंत



पूर्ण केली जाईल.

या कालावधीत प्राप्त झालेल्या गणना अर्जांचे डीजीटायझेशन पूर्ण झाल्यानंतर, जिल्ह्यातील आठही विधानसभा मतदारसंघांचा समावेश असलेली प्रारूप यादी २४ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध केली जाईल. त्यानंतर, २४ ऑगस्ट ते २३ सप्टेंबर या एक महिन्याच्या कालावधीत दावे आणि हरकती स्वीकारल्या जातील. नागरिकांकडून प्राप्त झालेल्या दावे आणि हरकतींची सुनावणी तसेच त्या निकाली काढण्याची प्रक्रिया २४ ऑगस्टपासून सुरू होऊन २२ ऑक्टोबरपर्यंत चालेल. ही सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यावर अंतिम मतदार यादी २७ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली आहे.सध्याच्या मतदार यादीनुसार, जिल्ह्यात एकूण २५ लाख ४५ हजार ६७७ मतदार आहेत. यापैकी, आतापर्यंत २१ लाख ३७ हजार १७२ (८३.८५ टक्के) मतदारांचे गणना अर्ज प्राप्त झाले असून त्यांचे डीजीटायझेशनही पूर्ण झाले आहे. जिल्ह्यातील मतदार यादीतून १ लाख ३६ हजार ५०८ मतदार कायमस्वरूपी जिल्ह्याबाहेर गेले आहेत. याशिवाय, १ लाख ३ हजार ४०२ मतदार मृत झाले आहेत, तर ४२ हजार २१७ मतदारांची नावे दोन ठिकाणी आढळली आहेत. घरभेटीदरम्यान वारंवार संपर्क करूनही ११ हजार २१७ मतदार सापडले नाहीत आणि ९३३ मतदारांच्या बाबतीत विविध अनियमितता आढळून आल्या आहेत. ही सर्व नावे यावेळच्या मतदार यादीत समाविष्ट नसतील.

# दहशतवादी कुठे मिळतील... काँग्रेसच्या कार्यालयात !

## राज्यसभेत भाजप खासदार बोंडे यांची जोरदार घोषणाबाजी

**विदर्भ प्रजासत्ताकदि.७नवी दिल्ली**

महाराष्ट्रातील. भाजपचे राज्यसभा खासदार डॉ. अनिल सुखदेवराव बोंडे यांच्या एका विधानाने सभागृहात भाजप आणि काँग्रेसमध्ये जोरदार शाब्दिक द्वंद्व बघायला मिळाले. दरम्यान, सत्ताधारी पक्षांकडून काँग्रेसविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.सध्या संसदेचे



पावसाळी अधिवेशन सुरू आहे. दरम्यान आज राज्यसभेत जोरदार गदारोळ बघायला मिळाला. महाराष्ट्रातील भाजपचे राज्यसभा खासदार डॉ. अनिल सुखदेवराव बोंडे यांच्या एका विधानाने सभागृहात भाजप आणि काँग्रेसमध्ये जोरदार शाब्दिक द्वंद्व बघायला मिळाले. दरम्यान, सत्ताधारी पक्षांकडून काँग्रेसविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.सभागृहातील चर्चेदरम्यान २०१४ पूर्वीच्या राजकीय परिस्थितीचा उल्लेख करत खासदार डॉ. अनिल बोंडे म्हणाले, २०१४ पूर्वी प्रत्येक लहान मूल म्हणून शकत होते, कोळसा चोर, भ्रष्टाचारी आणि दहशतवादी कुठे सापडतील? यावर, सत्ताधारी बाकांवर बसलेल्या भाजपच्या अन्य खासदारांनी लगेचच काँग्रेसच्या कार्यालयात ! असे उत्र दिले, अशा घोषणा देण्यास सुरुवात केली.यानंतर बोंडे पुढे म्हणाले, 'देशद्रोही कुठे मिळतील?', 'सैन्यविरोधी कुठे मिळतील?' 'शेतकरी विरोधी कुठे मिळतील?' असे प्रश्न विचारले. यावर सत्ताधारी बाकावरील खासदारांनी पुन्हा काँग्रेसच्या कार्यालयात ! काँग्रेसच्या कार्यालयात ! म्हणायला सुरुवात केली.

# जनजागृती सप्ताहातून मृत्यूनंतरही नवजीवनाचा संदेश



## चिखलदरा येथील ग्रामीण रुग्णालय, पोलिस ठाणे, तहसीलमध्ये जनजागृती अभियान

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अचलपूर -** राष्ट्रीय अवयव व उतक प्रत्यारोपण संस्था तसेच राज्य शासनाच्या निर्देशानुसार तीन ते १३ ऑगस्टदरम्यान साजऱ्या होत असलेल्या अवयवदान जनजागृती सप्ताहाला चिखलदरा येथील ग्रामीण रुग्णालयात प्रारंभ करण्यात आला. आज अवयवदानाबाबत समाजातील गैरसमज दूर करून नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे आणि मृत्यूनंतरही इतरांना नवजीवन देण्याच्या कार्यासाठी प्रेरित करणे, हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. सप्ताहाच्या प्रारंभी ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी हिरव्या रंगाचे वस्त्र परिधान करून अवयवदानाचा संदेश दिला अवयवदान जनजागृतीचे प्रतीक असलेल्या हिरव्या रंगाच्या माध्यमातून या उपक्रमात सर्वांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. त्यानंतर ग्रामीण रुग्णालयाच्या पथकाने चिखलदरा पोलिस ठाणे व तहसील कार्यालयात विशेष जनजागृती अभियान राबविले. अधिकारी व कर्मचाऱ्यांना अवयवदानाचे सामाजिक महत्त्व, मेंदू मृत्यूनंतर होणारे अवयवदान, अवयवदानामुळे अनेक गरजू रुग्णांना मिळणारे नवजीवन तसेच समाजात अवयवदानाबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्याची आवश्यकता, याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी उपस्थितांना अवयवदानाची प्रतिज्ञा देण्यात आली. तसेच इच्छुकांनी नोटो पोर्टलवर नोंदणी करून अवयवदाता म्हणून संकल्प करण्याचे आवाहन करण्यात आले. नोंदणीची प्रक्रिया व त्याचे महत्त्वही समजावून सांगण्यात आले. या उपक्रमाचे नेतृत्व वैद्यकीय अधीक्षक डॉ. गवई यांनी केले. यावेळी डॉ. आदित्य महांकर, डॉ. नितीन चव्हाण, डॉ. हेमंत लोखंडे, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी आश्विनी ठाकरे यांच्यासह ग्रामीण रुग्णालयातील सर्व वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, आरोग्य कर्मचारी व कर्मचारी उपस्थित होते.

# रविवारला वर्धेत रानभाजी महोत्सव

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७वर्धा**

कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाच्या संयुक्त वतीने जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात रविवार, ९ ऑगस्टला जिल्हास्तरीय रानभाजी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाला जास्तीत जास्त नागरिकांनी भेट देऊन महोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. सकाळी ११ ते ४ या वेळेत आयोजित करण्यात आलेल्या या महोत्सवाचे उद्घाटन पालकमंत्री डॉ. पंकज




भोयर यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी खा. अमर काळे, आत्मा नियामक मंडळाच्या अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी वान्मथी सी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. रानभाज्यांमध्ये कुंजर, अंबाडी, पाथरी, कारडू, कपाळफोडी, गवती चहा, शेवगा, करवंद, अळू, चिवर, गोडनिम, तरोटा, राजगिरा, आघाडा, केना, सुरण, फास बरबटी, कुकडा, घोगली, ताजे मशरुम, भूईनीम, आंबटचुका, मायाळु/पोई, माठ, गुळवेल, करवंदाचे लोणचे, अंबाडीचे सरबत, पावडर, भाकर, लोणचे, बेलाचे लोणचे, सरबत, यांसारखे विविध प्रकार प्रदर्शनात विक्रीकरिता उपलब्ध होणार आहे. रानभाजी महोत्सवादरम्यान पाककृती करून दाखविण्यात येणार असून शहरातील ग्राहकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आत्माच्या प्रकल्प संचालकांनी केले आहे.

# नांदगाव तालुक्यातील पूरग्रस्त शेकडो शेतकऱ्यांचा जिल्हाधिकाऱ्याना घेराव

## नांदगाव तालुक्याला नुकसान भरपाईसाठी विशेष पॅकेज देण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अमरावती-** नांदगाव तालुक्यात मुसळधार पावसाने शेतकऱ्यांचे संपूर्ण पिके खरडून गेल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले तसेच अनेक नागरिकांचे घरात पाणी शिरल्याने घरे पूर्णता पडली घरातील जीवनावश्यक वस्तू वाहून गेल्याने अनेकांचे घरावर उपासमारीची वेळ आली आहे. शिवसेना उबाठा चे समन्वयक नांदगाव न.पं. चे गटनेते प्रकाश मारोटकर यांचे नेतृत्वात शेकडो शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देऊन जिल्हाधिकारी यांना घेराव करून नांदगाव तालुक्याला नुकसान भरपाईचे विशेष पॅकेज देण्याची मागणी निवेदनाद्वारे केली. मंगरुळ चव्हाळा, धामक, धानोरा शिक्रा, शिवणी व नांदगाव शहरातील शेकडो नागरिकांचे घरात पाणी गेल्याने घरातील संपूर्ण अन्नधान्य कपडे भांडे, विद्यार्थ्यांचे पुस्तके संपूर्ण खराब झाले



अनेकांचे संसार उघड्यावर आलेत असून राहायला घर राहिले नाही दुसरीकडे शेतातील पिकांन सोबतच शेती उपयोगी स्पिंकलर पाईप, टिनपत्रे, ताराचे कुपन, बांधलेल्या विहिरी सुध्दा खचल्या पाण्याची मोटर कृषी पंपाचे इलेक्ट्रिक पोल पडले आणि सोलरचे कृषी पंप खराब झाले.कांदा चाळ मधील कांदा खराब झाला अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील गायी, बैल,बकऱ्या कोंबड्या सुद्धा वाहून गेल्या शेतात जाणारे पांधान रस्ते, पूल,बंधारे, छोटे नाले, डांबरी रस्ते पूर्ण वाहून गेले त्यामुळे नांदगाव तालुक्यातील शेतकऱ्यांवर मोठे संकट आले आहे शासनाने तुटपुंजी मदत न करता नुकसान संपूर्ण भरपाईसाठी तालुक्याला विशेष मदतीचे पॅकेज देण्याची मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली बाळासाहेब राणे सुनील गुरमुळे वासुदेव लोखंडे गुणवंत चांदूरकर रमेश मांडवगडे प्रकाश भ्रमणवाडे सुनील ब्राह्मणवाडे गजानन मारोटकर लोकेश उटबगले रवि ठाकूर दामोधर ब्रह्मणवादे बाळा सुने बाबराव राऊत विजय सुने वाल्मिक दहातोंडे सुरेंद्र गावफळे नितीन दुधे शंकर मांडवगडे विजय पेटले पंकज पिंपळकर संतोष सुर्जुसे गजानन गंधे अक्षय राणे किशोर मुंजेवार मो सादिक पांडुरंग राठोड महल्ले मनोज ढोकेउपस्थित होते.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# तिवस्यातल्या राजकारणात खरच होणार का बदल?

## आ.राणांच्या 'त्या' वक्तव्याने विद्यमान आ.राजेश वानखडेंच्या राजकारणावर प्रश्नचिन्ह?

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७ अमरावती–** तिवसा मतदारसंघाचे आमदार रविराज भाऊच होते. त्यांची तिकीट कापण्याचे काम मी केले. मी जे बोलतो ते सत्य होत असते. तिवस्यात बदल निश्चित आहे, असे विधान आमदार रवी राणा यांनी व्यासपीठावरून जाहीरपणे केले. भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यात आमदार रवी राणा यांनी केलेल्या उपरोक्त वक्तव्याने तिवसा मतदारसंघातील राजकीय वातावरण चांगलेच ढवळून निघाले आहे. त्यांच्या विधानाने भांजपच्या गोटात चांगलीच खळबळ उडाली असून चर्चा सुरू झालेली आहे.

रवी राणांनी नेमका कोणाकडे इशारा केला, याची राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे. त्यांच्या वक्तव्याचा रोख विद्यमान आमदार राजेश वानखडे यांच्या दिशेने असल्याची चर्चा सुरू आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तिवसा

मतदारसंघातील राजकारण आणखी तापण्याची चिन्हे दिसत आहेत. दुसरीकडे, भाजपमध्येही गेल्या काही दिवसांपासून मोठ्या हालचाली सुरू आहेत. आमदार प्रवीण पोटे-पाटील निष्ठावंत भाजप कार्यकर्त्यांना पुन्हा एकत्र आणण्याचा प्रयत्न करत आहेत. तर आमदार राजेश वानखडेही मतदारसंघात पूर्ण ताकदीने सक्रिय झाले आहेत. अशा वेळी रवी राणांचे हे वक्तव्य राजकीयदृष्ट्या




महत्त्वाचे मानले जात आहे.राणांनी रविराज देशमुख भावी आमदार म्हणून एक पोस्ट ही शोषल मीडियावर व्हायरल केली आहे.आ. रवी राणा यांनी सांगितले की, रविराज देशमुख हे भाजपचे निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. भाजपाची शून्यापासून त्यांनी सेवा केली आहे. निष्ठावान कार्यकर्ता म्हणूनच त्यांचे नाव आहे. त्यांच्यावर अन्याय होऊ देणार नाही. उल्लेखनीय असे की, त्यांनी ग्रामीण जिल्हाध्यक्षपद भूषविले होते. मात्र अवघ्या एका वर्षात त्यांना पदाचा राजीनामा द्यावा लागला. त्या वेळीही पक्षांतर्गत राजकारणाची चर्चा रंगली होती. आता रवी राणांनी तिकीट कापण्याचे काम. मी केले असे जाहीरपणे सांगितल्याने त्या चर्चांना पुन्हा खतपाणी मिळाले आहे. तिवस्यात बदल निश्चित आहे या आमदार रवी राणांच्या विधानामुळे आता अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. तिवसा मतदारसंघात भाजपचे रविराज देशमुख यांचा नवा चेहरा मिळणार का ? तिवस्यात बदल निश्चित! या वक्तव्याचे पडसाद किती उमटतात, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे नक्ष लागले आहे.

### शुभेच्छा देणाऱ्यांची गर्दी

रविराज देशमुख यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी सकाळपासूनच शुभेच्छुकांची गर्दी जमली होती. माजी खासदार नवनीत राणा, आमदार रवी राणा, आमदार राजेश वानखडे, आमदार प्रताप अडसड, महापौर श्रीचंद तेजवानी, रूपाली माथने, सुवर्णा वरखेडे नगरसेवक मिलींद बांबल यांच्यासह अनेकांनी हजेरी लावली.

# सायबर गुन्ह्यात आंतरराज्यीय टोळी गजाआड

## २० राज्यांतील फ्रॉडची रक्कम एकाच खात्यात जमा, ७१ लाखांचा झाला व्यवहार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती–**

गोरगरिबांना आमिष दाखवून त्यांच्या नावाने काढलेल्या अकाउंटचा सायबर फ्रॉडसाठी वापर करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीतील तिघांना सायबर पोलिसांनी अटक केली आहे. तिघेही अमरावती पोलिसांच्या कोठडीत आहेत. शेख अमीन शेख लतीफ, रवी विश्वनाथ गडलिंग (रा. राहुलनगर, बिच्छूटेकडी) व आकाश दीपक जयसिंघानी, असे अटक तिघांची नावे असल्याची माहिती सायबर ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक अनिकेत कासार यांनी दिली. आठवड्यापूर्वीच शहर सायबर पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली होती. बँक ऑफ इंडिया अमरावती येथील एका बँक खात्याचा देशातील विविध २० राज्यांतील सायबर फसवणुकीची रक्कम जमा करण्यात आली होती. सदर खात्याची केवायसी, दस्तऐवज, खात्याच्या व्यवहाराची माहिती, पडताळणी केल्यानंतर सदर खाते हे संशयित शेख अमीन शेख लतीफ यांच्या नावावर असल्याचे स्पष्ट झाले होते. तांत्रिक तपासात सायबर फसवणुकीतील प्राप्त झालेली रक्कम या खात्यात जमा करून ती पुढे विविध बँकखात्यांमध्ये व इतर माध्यमांतून हस्तांतरित करण्यात येत असल्याचे निष्पन्न झाले. प्राथमिक तपासात सदर खाते सायबर फसवणूक, ऑनलाइन गेमिंग व क्रिप्टोकरन्सी व्यवहारासाठी हे म्यूल अकाउंट म्हणून वापरण्यात आल्याचे निष्पन्न झाले होते. सदर खात्यावर सुमारे ७१ लाखांचा आर्थिक व्यवहार झाल्याचे दिसून आले. अमरावती शहर सायबर पोलिसांनी गुन्हा नोंदवून तांत्रिक विश्लेषणाद्वारे सुरवातीला शेख अमीन शेख लतीफ याला अटक केली. त्याने पैशाच्या मोबदल्यात बँकखाते संशयित रवी विश्वनाथ गडलिंग (रा. राहुलनगर) याला उपलब्ध करून दिल्याचे निष्पन्न झाले. या तपासात रवी गडलिंग याने सदर खाते हे आकाश जयसिंघानी (पोद्दार बगीचा, रामनगर, वर्धा) याला वापरण्यास दिल्याचे तपासात निष्पन्न झाले होते. नमूद तिघांना गुन्ह्यात अटक करण्यात आली असून, त्यांचे आंतरराज्यीय कनेक्शन तपासण्याची प्रक्रिया पोलिसांनी सुरू केली होती. या रॅकेटमध्ये अन्य कोणकोण सहभागी आहेत, त्याबाबत तपास सुरू करण्यात आला आहे.

अटकेनंतर संशयित आकाश जयसिंघानीकडून चार सीमकार्ड, विविध बँक खात्यांच्या आर्थिक उलाढालीचे दस्तऐवज, काही चिठ्ठ्या व दोन मोबाईल हॅण्डसेट जप्त करण्यात आले.

नागरिकांनी कमिशन किंवा इतर कोणत्याही आमिषाला बळी पडून आपले बँकखाते, एटीएम कार्ड, यूपीआय किंवा बँकेची गोपनीय माहिती इतरांना देऊ नये. कारण स्वत:चे खाते दुसऱ्याला उपलब्ध करून देणे कायद्याने गुन्हा आहे. त्यांच्यापासून सावध राहावे.

**–अनिकेत कासार,** सहायक पोलिस निरीक्षक, सायबर ठाणे.



# अमली पदार्थ तस्करी व अवैध धंद्यामध्ये सहभाग

## तब्बल ६० आरोपींचा एसपींनी घेतला क्लास

### 'ऑपरेशन कवच' अंतर्गत आरोपींचे समुपदेशन गुन्हा पुन्हा न करण्याची ताकीद

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती –** ग्रामीण भागातील अमली पदार्थांची तस्करी आणि अवैध व्यापार पूर्णपणे रोखण्याच्या उद्देशाने, पोलिस अधीक्षक निकेतन कदम यांच्या नेतृत्वाखाली 'ऑपरेशन कवच' अंतर्गत एक अनोखा आणि कठोर उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या मोहिमेचा एक भाग म्हणून, जिल्ह्यातील विविध पोलिस ठाण्यांच्या हद्दीत एनडीपीएस कायद्यांतर्गत नोंदवलेल्या प्रकरणांमधील ६० आरोपींना विशेष चौकशी आणि समुपदेशनासाठी पोलिस



अधीक्षकांच्या कार्यालयात बोलावण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश केवळ गुन्हेगारांवर कारवाई करणे हाच नाही, तर त्यांना पुन्हा अमली पदार्थांच्या व्यापारात प्रवेश करण्यापासून रोखणे आणि समाजात अमली पदार्थांच्या गैरवापराविरोधात जागरूकता निर्माण करणे हा देखील आहे. विशेष चौकशीदरम्यान, प्रत्येक आरोपीची त्यांच्या सध्याच्या नोकरी, व्यवसाय, उपजीविकेचे साधन आणि दैनंदिन कामांविषयी सविस्तर चौकशी करण्यात आली. सध्या सक्रिय असलेल्या एनडीपीएस गुन्हेगारांशी किंवा अमली पदार्थांच्या तस्करांशी असलेल्या ' त्यांच्या संबंधांविषयीही पोलिसांनी माहिती गोळा केली. अधिकाऱ्यांनी आरोपींना स्पष्टपणे ताकीद दिली की, भविष्यात अमली पदार्थांची खरेदी, विक्री, तस्करी, साठवणूक, अवैध व्यापार किवा सेवन यासंबंधीच्या कोणत्याही गुन्ह्यात ते सहभागी आढळल्यास त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. त्यांना आवश्यक प्रतिबंधात्मक उपाय योजनांबाबतही सूचना देण्यात आल्या.

# भर पावसाळ्यातही... नांदगाव खंडेश्वर शहरात टँकरने पाणीपुरवठा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७नांदगाव खंडेश्वर**

पावसाळ्याच्या दिवसांतही नांदगाव खंडेश्वर शहरात टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याची वेळ आल्याने शहरवासीयांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. एकीकडे सर्वत्र पावसाने हजेरी लावलेली असताना, दुसरीकडे पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना टँकरवर अवलंबून राहावे लागत असल्याने स्थानिक प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



### कोट्यवधींच्या पाणी योजनांनंतरही नागरिकांची तहान कायम प्रशासन व सत्ताधाऱ्यांवर नागरिकांचा संताप

शहरासाठी विविध पाणीपुरवठा योजनांवर मोठ्या प्रमाणात निधी खर्च करण्यात आल्याचे सांगितले जाते. मात्र प्रत्यक्षात अनेक भागांमध्ये नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा होत नसल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. अनेक परिसरात नळांना पाणी येत नसल्याने नागरिकांची टँकरकडे धाव सुरू आहे. यामुळे प्रशासन आणि सत्ताधाऱ्यांच्या आश्वासनांवर नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. 'दरवर्षी पाणीप्रश्न सोडविण्याच्या घोषणा होतात, परंतु परिस्थिती मात्र बदलत नाही.

पावसाळ्यातही टँकरने पाणीपुरवठा होत असेल, तर कायमस्वरूपी पाणीप्रश्न नेमका कधी सुटणार?' असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

नागरिकांनी शहरासाठी दीर्घकालीन व शाश्वत पाणीपुरवठा व्यवस्था उभारण्याची, पाणीपुरवठ्यातील त्रुटी दूर करण्याची आणि टँकरवरील अवलंबित्व कायमचे संपविण्याची मागणी केली आहे. पाणी प्रश्नाबाबत तातडीने ठोस उपाययोजना न केल्यास नागरिकांकडूनतीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला जात आहे.

# महापालिका स्थापना दिनानिमित्त सामाजिक उपक्रमांचे आयोजन

## १५ ऑगस्ट स्थापना दिन, जनतेचा उत्सव-शहराच्या विकासाचा संकल्प

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती –** अमरावती महानगरपालिकेचा १५ ऑगस्ट रोजी होणारा स्थापनादिन यंदा सामाजिक बांधीलकी, पर्यावरण संवर्धन, आरोग्य जनजागृती आणि सांस्कृतिक वैभवाचा संगम ठरणाऱ्या विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या अनुषंगाने महापौर श्रीचंद तेजवानी यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण नियोजन बैठक पार पडली. बैठकीत स्थापनादिन हा केवळ औपचारिक कार्यक्रम न राहता 'जनतेचा उत्सव-शहराच्या विकासाचा संकल्प' या संकल्पनेतून साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. स्थापना दिनाच्या पूर्वसंध्येला पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था, सामाजिक संघटना, युवक मंडळे आणि नागरिकांच्या सहभागाने शहरभर मोठ्या प्रमाणावर



वृक्षारोपण अभियान राबविण्यात येणार आहे. त्याचबरोबर भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. १५ ऑगस्ट रोजी स्थापना दिनानिमित्त विविध मान्यवरांच्या उपस्थितीत महानगरपालिकेच्या स्थापनेपासून शहराच्या विकासात मोलाचे योगदान देणाऱ्या सर्व माजी महापौरांचा विशेष सत्कार करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात येणार आहे. याशिवाय संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. स्वातंत्र्यदिन आणि महानगरपालिका स्थापनादिन या दुहेरी पर्वाचे औचित्य साधून देशभक्ती गीतगायन स्पर्धा, 'वर्धापन दिन व १५ ऑगस्ट' या विषयावरील रांगोळी स्पर्धा, महाराष्ट्राच्या संस्कृतीवर आधारित नृत्य, अभंग, गवळण, भारुड अशा विविध लोककलांचा २५ पेक्षा अधिक कलाकारांच्या सहभागातून रंगणारा मनोरंजक सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. महानगरपालिकेच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या ऐतिहासिक प्रवासाचे दर्शन घडविणारी दुर्मीळ छायाचित्रांची विशेष प्रदर्शनी, सफाई कर्मचारी, इतर मनपा कर्मचारी आणि नागरिकांसाठी विविध तपासण्या, सर्वसमावेशक आरोग्यतपासणी शिबिर व नेत्रतपासणी शिबिर आयोजित करण्यात येणार आहे. या बैठकीत उपमहापौर सचिन भेंडे, स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, सभागृह नेते चेतन गावंडे, विरोधी पक्षनेते विलास इंगोले, गटनेते नाना आमले, नगरसेवक रतन डेंडुले, डॉ. प्रशांत देशपांडे, अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, उपायुक्त योगेश पिठे, उपायुक्त भाग्यश्री बोरेकर तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# आदर्श विद्यालयाची क्रीडाक्षेत्रात भरारी

## खो-खो व आट्यापाट्यांत १५ खेळाडू राष्ट्रीय स्तरावर, एकाची आंतरराष्ट्रीय स्पर्धेत निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७परतवाडा**

अचलपूर तालुक्यातील भुगाव येथील आदर्श विद्यालयाने क्रीडाक्षेत्रातील आपली गौरवशाली परंपरा कायम राखत यंदाही उल्लेखनीय यश संपादन केले आहे. शाळेतील विद्यार्थ्यांनी खो-खो व आट्यापाट्या या पारंपरिक मैदानी खेळांत उत्कृष्ट कामगिरी करीत तब्बल १५ खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरापर्यंत मजल मारली असून, एका खेळाडूची आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठीही निवड झाली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना योग्य प्रशिक्षण, सक्षम मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण सरावाची संधी मिळाल्यास ते राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरही चमकदार कामगिरी करू शकतात, हे आदर्श विद्यालयाच्या यशाने पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. शाळेच्या क्रीडा विभागाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांची खो-खो व आट्यापाट्या या खेळांतील कामगिरी सातत्याने उंचावत आहे. या यशामागे विद्यार्थ्यांची मेहनत, जिद्द आणि चिकाटीबरोबरच शिक्षक, क्रीडा मार्गदर्शक आणि शाळा व्यवस्थापनाचे मोलाचे योगदान असल्याचे मुख्याध्यापक




वैभव काळे यांनी सांगितले. राष्ट्रीय स्तरावर यश संपादन करणाऱ्या खेळाडूंमध्ये राधा बोबडे, भाविका ठाकरे, अक्षरा धुमाळे, सृष्टी कडू, मेघा हूड, वेदिका हूड, स्नेहा भिसे, आनंदी हरणे, अक्षरा चिंचोळकर, सानिका सोलव, जानवी कडू, अश्विनी कडू यांच्यासह अन्य खेळाडूंचा समावेश आहे. या यशासाठी मुख्याध्यापक वैभव काळे, क्रीडाशिक्षक निकेश शिंगणे, संस्थेचे अध्यक्ष प्रदीप पाटील, क्रीडा मार्गदर्शक प्रदीप भुरे, राम धंडारे तसेच माजी मुख्याध्यापक राजेंद्र गादे यांचे मार्गदर्शन लाभले. शाळेच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरांतून कौतुक होत असून, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी ही कामगिरी प्रेरणादायी ठरत आहे.

P. R. Pote Patil Educational Group, Amravati.

**P. R. Patil College of Architecture, Amravati**

Approved by Council of Architecture & Run by M.S.B.T.E Mumbai.

CONTACT US - 8446002324, 8830518431, 07212970435

ADDRESS : Pote Patil Road Amravati. EMAIL : prparchitech@gmail.com, WEB : www.prpotepatilarch.ac.in

**ADMISSION NOTIFICATION**

Applications are invited from SSC Passed candidates for First year

**Diploma in Architecture / Diploma in Interior Design for**

Academic year 2026-27, Against CAP Vacancy and Institute level quota

| Activity Schedule | Dates |
|---|---|
| Issue & Receipt of Application Form | 09/08/2026 To 12/08/2026 (Upto 5pm) |
| Display of Final Merit list on College Notice Board | 12/08/2026 (After 5 pm) |
| Counselling & Confirmation of Admission | 13/08/2026 To 14/08/2026 (Upto 5pm) |

# आमच्या पक्षात लुडबुड करू नका; नौटंकी बंद करा!

## भाजप आमदार राजेश वानखडे यांचा रवी राणांवर घणाघाती हल्लाबोल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ अमरावती–** तिवसा विधानसभा मतदारसंघाच्या आमदारांनी नाव न घेता माजी खासदार रवी राणा यांच्यावर जोरदार टीका करत राजकीय वातावरण तापवले आहे. गुरुवारी आ.रवि राणा यांनी तिवसा मतदार संघातील भावी उमेदवार म्हणून रविराज देशमुख यांचा नावाचा उल्लेख करीत गेल्या निवडणुकीमध्ये मैच रविराज यांची टिकिट कापलिअसल्याचेवक्तव्य केले होते तय वक्तयावर आज भाजप ग्रामीण अध्यक्ष प्रटप दादा अदसड़ ,आ. प्रवीण पोटे पाटील,आ.राजेश वानखड़े व् भाजप पदाधिकारी यांनी पत्रकार परिषद घेत आ. राणांचा चांगलाच समाचार घेतलाविधानसभा निवडणुकीतील विजयाचे श्रेय घेण्याचा काही नेत्यांचा प्रयत्न केविलवाणा असल्याचा आरोप करत, संपूर्ण जिल्ह्याचे राजकारण आपणच घडवतो, असा गोड गैरसमज करून घेतलेल्या नौटंकीबाज नेत्यांनी भाजपाच्या विजयाचे श्रेय घेऊ नये, असा टोला ही आ.राजेश वानखड़े यांनी लगावला. इतरांच्या मतदारसंघात अनावश्यक हस्तक्षेप करू नये, अन्यथा बडनेरा मतदारसंघातील घडामोडी जनतेसमोर मांडू, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.अमरावती आणि दर्यापूर विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या उमेदवारांना पराभूत करण्यासाठी प्रयत्न झाल्याचा आरोप करत, अमरावतीत भाजपाच्या निष्ठावान कार्यकर्त्यांनी तो डाव उधळून लावल्याचा दावा त्यांनी केला. भाजपाचे नेतृत्व, कार्यकर्त्यांचे परिश्रम आणि जनतेच्या पाठिंब्यामुळेच मोठे मताधिक्य मिळाल्याचा विसर पडू देऊ नका, असेही त्यांनी म्हटले.महानगरपालिका निवडणुकीत भाजपासोबत झालेल्या कथित बेईमानीचाही उल्लेख करत, त्याचे परिणाम योग्य वेळी दिसतील, असा इशारा देण्यात आला. तसेच तिवसा मतदारसंघातील उमेदवारी जाहीर होण्यापूर्वी विविध राजकीय 'गेम' खेळल्याचा आरोप करत, भाजपातील उमेदवारी तुमच्या सांगण्यावरून दिली जाते, अशा थापा मारणे बंद करा, असेही त्यांनी सुनावले.शेवटी महायुतीचा धर्म निभवा, आमच्या पक्षात लुडबुड करू नका. पक्ष नेतृत्वासमोर लोटांगण आणि कार्यकर्त्यांचे खच्चीकरण ही नौटंकी बंद करा, असा थेट संदेश देत येणारा काळच बदल कुठे आणि कसा होणार याचे उत्तर देईल, असा दावा आमदार राजेश वानखडे यांनी केला.



### हा संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न – आ.पोटे

प्रवीण पोटे यांनी देखील रवी राणा यांच्या वक्तव्यानंतर प्रतिक्रिया दिली.पार्लमेंट बोर्ड तिकीट कोणाला द्यायची कुणाची कापायचे हे ठरवतात बाहेरचा व्यक्ती तिकीटवर बोलणं ही संयुक्तिक नाही बाहेरच्या लोकांनी बोलू नये ,कुणी दावा करत असेल तर तो दावा खोटा आहे हा संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न आहे असं प्रवीण पोटे म्हणाले.आम्ही किंवा आमचा पक्ष कुबड्या घेऊन आलो नाहीत आम्ही सक्षम आहोत.

### कोणाची तिकीट मी कापली, कोणाला मी देतो, हा विषय तर होऊ शकत नाही – आ.अडसड

भाजप पक्षामध्ये आजपर्यंत पक्षाच्या तिकिटाच फायनल हे पार्लमेंटरी बोर्डातच होत असते...कोणाची तिकीट मी कापली, कोणाला मी देतो, हा विषय तर होऊ शकत नाही त्यामुळे रवी राणा यांच्या त्या वक्तव्यामध्ये काहीही तथ्य नाही...भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम होऊ नये म्हणून ही आज ही आम्ही पत्रकार परिषद घेतली असं स्पष्टीकरण आमदार प्रताप अडसड यांनी दिलं,

### रवी राणांच ते मत वैयक्तिक ....

चुकीच्या माणसाला त्यांनी निवडलं असेल म्हणून त्यांना पश्चाताप झाला असेल–रविराज देशमुख यांच वक्तव्यविदर्भ प्रजासत्ताकदि.७अमरावती २८अमरावतीच राजकारण पुन्हा एकदा तापलं आहे..तिवसा मतदारसंघाचे आमदार रविराज देशमुखच होते पण तेव्हा त्यांचे तिकिट कापायचं कामही मीच केलं.अमरावतीच्या तिवसा मतदारसंघात बदल निश्चित आहे आणि तो बदल रवी राणा करनार आहे असं वक्तव्य आमदार रवी राणा यांनी केलं होतं, यावर भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख यांनी रवी राणा यांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया दिली, रवी राणा यांना पश्चाताप झाला असेल चुकीचा माणसावर अन्याय झाला , आणि चुकीच्या माणसाला त्यांनी निवडलं म्हणून त्यांना पश्चाताप झाला असं असेल मात्र हे त्यांच वैयक्तिक मत आहे , त्यांची चूक झाली असेल अस स्पष्टीकरण रविराज देशमुख यांनी दिलं तर मी प्रामाणिक भारतीय जनता पार्टीचा कार्यकर्ता आहे असं ठाम मत रविराज देशमुख यावेळी मांडल..

---

## वलगाव ठाण्यात जनजागृतीबाबत बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ वलगाव**
ग्रामीण भागात 'चोर आले', अशा अफवा सोशल मीडियावर पसरत असल्याच्या पार्श्वभूमीवर वलगाव पोलिसांनी जनजागृती व समन्वय बैठक घेऊन नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले. बैठकीला पोलिस पाटील, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष, शांतता समितीचे सदस्य, ग्रामसुरक्षा दल, महिला प्रतिनिधी व प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. वरिष्ठ पोलिस निरीक्षक रीता उईके यांनी संशयास्पद हालचाली आढळल्यास स्वतः कायदा हातात न घेता तत्काळ वलगाव पोलिस ठाणे किंवा डायल ११२ वर माहिती देण्याचे आवाहन केले. अफवा पसरविणे किंवा अस्पष्ट माहिती प्रसारित करणे हा दंडनीय गुन्हा आहे. अशाप्रकारांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला. सहायक पोलिस निरीक्षक अशोक शिर्के यांनी ग्रामसुरक्षा दल सक्रिय ठेवून पोलिसांशी समन्वय राखण्याचे आवाहन केले.



कार्यक्रमाचे समन्वयन पोलिस हेडकॉन्स्टेबल नीलेश घाटे यांनी केले. उपस्थितांनी गावागावांत जनजागृती करून अफवा रोखण्यासाठी पोलिसांना सहकार्य करण्याची ग्वाही दिली.

---

## रेल्वेच्या हद्दीजवळ बांधकाम करताय? एनओसी बंधनकारक

### अतिक्रमणाला आळा : अनधिकृत बांधकामांना नुकसानभरपाई नाही

**अरुण जोशी**
**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती–**रेल्वेच्या हद्दी लगत होणाऱ्या अनधिकृत बांधकामांना आळा घालण्यासाठी मध्य रेल्वेने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. रेल्वेच्या जमिनीच्या सीमारेषेपासून ३० मीटरच्या परिसरात कोणतेही नवीन बांधकाम करण्यापूर्वी रेल्वे प्रशासनाचे ना–हरकत प्रमाणप (एनओसी) घेणे आता बंधनकारक राहणार आहे.'एनओसी' शिवाय उभारण्यात आलेली बांधकामे अनधिकृत ठरवून त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्यात येणार आहे. अशा बांधकामांमुळे रेल्वेच्या सुरक्षेला धोका निर्माण होण्यासोबतच



देखभाल व विस्तार प्रकल्पांमध्ये अडथळे निर्माण होतात. भविष्यात रेल्वे प्रकल्पांच्या कामांना गती देण्यासाठी आणि सुरक्षेच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच नियमबाह्य बांधकामे हटविल्यास संबंधितांना कोणतीही नुकसानभरपाई दिली जाणार नाही. रेल्वे सुरक्षेसह भविष्यातील प्रकल्पांच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.रेल्वेमार्ग विस्तार, नवीन प्रकल्प आणि पायाभूत सुविधांच्या कामांमध्ये अनधिकृत बांधकामांमुळे विलंब होण्याची शक्यता असते. त्यामुळे नियोजनबद्ध विकासासाठी 'एनओसी'ची अट लागू करण्यात आली आहे. यामुळे भविष्यातील समस्या सुटण्यास मदत होणार आहे.रेल्वेच्या जमिनीच्या सीमेपासून ३० मीटरपर्यंतच्या परिसरात हा नियम लागू करण्यात आला आहे. या क्षेत्रातील बांधकामांसाठी रेल्वे प्रशासनाची परवानगी घेणे बंधनकारक राहणार आहे.एनओसी न घेता उभारण्यात आलेली बांधकामे अनधिकृत समजली जाणार आहेत. अशा बांधकामांवर कारवाई झाल्यास संबंधितांना कोणतीही नुकसानभरपाई दिली जाणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

#### ड्रोनद्वारे सर्वेक्षण केले जाणार

रेल्वे हद्दीतील अतिक्रमण आणिअनधिकृत बांधकामांचा शोधघेण्यासाठी ड्रोनद्वारे सर्वेक्षण करण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. यामुळे रेल्वे प्रशासनाला परिस्थितीवर लक्ष ठेवणे सोपे होणार आहे.

---

## एसआयआरच्या अतिरिक्त कामामुळे अध्यापनावर परिणाम

### शिक्षकांना अशैक्षणिक कामांतून मुक्त करण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती :** विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेसाठी शिक्षकांना बीएलओ म्हणून नियुक्त केल्यामुळे त्यांच्या नियमित अध्यापनावर परिणाम होत असल्याची चिंता शिक्षक संघटनांनी व्यक्त केली आहे. शाळेतील अध्यापन, प्रशासकीय कामे आणि विद्यार्थ्यांशी संबंधित जबाबदाऱ्या पार पाडल्यानंतर शिक्षकांना घराघरांत जाऊन मतदार पडताळणी, अर्ज स्वीकारणे, कागदपत्रांची तपासणी, ऑनलाइन नोंदी करणे तसेच मृत व स्थलांतरित मतदारांची पडताळणी करावी लागत आहे. त्यामुळे शिक्षकांवर शारीरिक व मानसिक ताण वाढत असल्याचे सांगितले जात आहे.निवडणूक आयोगाच्या नियोजनानुसार ३० जून ते ११ ऑगस्टदरम्यान क्षेत्रीय पडताळणी, तर २४ ऑगस्ट ते २३ सप्टेंबरदरम्यान दावे व हरकतींची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. या अतिरिक्त कामामुळे अध्यापनाची तयारी, एकाग्रता



आणि गुणवत्तेवर परिणाम होत असल्याची भावना शिक्षकांनी व्यक्त केली. शहरातील अनेक भागांत नागरिकांकडूनही बीएलओंना अपेक्षित सहकार्य मिळत नसल्याची तक्रार आहे.शिक्षक समितीचे राज्य प्रसिद्धी प्रमुख राजेश सावरकर यांनी शिक्षकांना अशैक्षणिक कामांतून मुक्त करून एसआयआरची जबाबदारी इतर शासकीय कर्मचाऱ्यांकडे सोपवावी, अशी मागणी केली. शिक्षणाची गुणवत्ता अबाधित ठेवण्यासाठी शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी शिक्षक संघटनांनी केली आहे.

---



## विकासकामांतील 'मलिदा' थांबणार!

### १ ऑक्टोबरपासून 'जिओ-टॅग्ड युनिक इन्फ्रा आयडी' अनिवार्य

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**
राज्यातील सार्वजनिक पायाभूत सुविधा विकासकामांमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी आणि निधीच्या गैरवापराला आळा घालण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. १ ऑक्टोबरपासून राज्यातील सर्व सार्वजनिक पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी 'जिओ–टॅग्ड युनिक इन्फ्रा आयडी' प्रणाली लागू करण्यात येणार आहे. या प्रणालीमुळे प्रत्येक विकासकामाचा अचूक व डिजिटल लेखाजोखा ठेवता येणार असून, कामाची प्रगती आणि गुणवत्ता यावरही प्रभावी नियंत्रण ठेवता येईल.या नव्या व्यवस्थेनुसार प्रत्येक विकासकामाला प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर १३ अंकी अल्फान्यूमेरिक 'महा–युनिव्हर्सल आयडी' दिला जाईल. हा आयडी संबंधित प्रकल्पाचा मुख्य संदर्भ क्रमांक असेल. विकासकामाच्या ठिकाणाचे अचूक अक्षांश–रेखांश (ऋॠे–ींरससळपस) नोंदवून त्याची माहिती प्रणालीमध्ये अपलोड केली जाईल. काम सुरू झाल्यानंतर तसेच विविध टप्प्यांवरील छायाचित्रे आणि प्रगती अहवाल नियमितपणे अद्ययावत करणे बंधनकारक असेल.राज्य सरकार या प्रणालीत कृत्रिम बुद्धिमत्ता (–ख) आणि जीआयएस मॅपिंगचा वापर करणार आहे. त्यामुळे अधिकारी कार्यालयातूनच विकासकामांची ऑनलाइन पाहणी करू शकतील. कामाचा दर्जा, अचूकता आणि प्रत्यक्ष प्रगतीवर सातत्याने लक्ष ठेवणे शक्य होणार आहे.या प्रणालीचा सर्वात मोठा फायदा म्हणजे डबल बिलिंग आणि एकाच कामासाठी दोनदा निधी उचलण्यास आळा बसणार आहे. प्रत्येक विकासकामाची स्वतंत्र डिजिटल ओळख असल्यामुळे निधीचा गैरवापर रोखणे अधिक सुलभ होईल. तसेच कामाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच संबंधित बिले मंजूर केली जाणार आहेत.ही योजना केवळ नवीन प्रकल्पांपुरती मर्यादित नसून २०२१ पासून मंजूर झालेल्या पूर्ण आणि अपूर्ण सर्व पायाभूत विकासकामांचा या प्रणालीत समावेश करण्यात येणार आहे. त्यामुळे जुन्या कामांचाही डिजिटल मागोवा घेता येईल.या नव्या व्यवस्थेमुळे नागरिकांनाही विकासकामांचा प्रत्यक्ष लाभ, त्याचा सामाजिक परिणाम आणि कामाची गुणवत्ता तपासण्याची संधी उपलब्ध होणार असून, सार्वजनिक निधीच्या वापरात अधिक पारदर्शकता आणि उत्तरदायित्व निर्माण होईल.–

#### प्रत्येक सार्वजनिक प्रकल्पाला 'महा–युनिव्हर्सल आयडी'; एआय व जीआयएसद्वारे ऑनलाइन देखरेख, डबल बिलिंगला बसणार आळा

---

## मेळघाटातील धक्कादायक वास्तव पुन्हा आले समोर

# कुसुमकोटमध्ये तीव्र कुपोषित बालक आढळले

### धारणीसह जिल्ह्याच्या आरोग्य व्यवस्थेत खळबळ शासकीय योजनांमुळे दिव्यांग मातांसमोर आव्हान



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७मेळघाट –**
मेळाघाटात कुपोषणाची समस्या पूर्णपणे दूर कार्यक्रम, पोषण मोहिमा आणि आरोग्य व महिला व बाल विकास विभागांच्या अथक प्रयत्नांनंतरही, अनेक मुले अजूनही कुपोषणाशीझुंज देत आहेत. धारणी मुख्यालयापासून अवघ्या दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या कुसुमकोट बुजुर्ग गावात असेच एक प्रकरण समोर आले आहे. या गावात १० महिन्यांचा तुषार सूरज कासदेकर तीव्र कुपोषणाने (श्रेणी चार) ग्रस्त असल्याने खळबळ उडाली आहे.

प्राप्त माहितीनुसार, तुषारचा जन्म २३ ऑक्टोबर २०२५ रोजी झाला.जन्मावेळी त्याचे वजन अंदाजे २ किलो ३०० ग्रॅम होते. हळूहळू, जसजसा तो मोठा होत गेला, तसतसा त्याचा शारीरिक विकास अपेक्षेप्रमाणे झालानाही आणितोतीव्र कुपोषणाच्या श्रेणीत पोहोचला. त्याची सध्याची स्थितीचितेचा विषय आहे.सर्वात हृदयद्रावक बाब म्हणजे तुषारची आई स्वतः दिव्यांग आहे. शारीरिक आव्हाने असूनही, ती आपल्या मुलाची काळजी घेण्यासाठी कोणतीही कसर सोडत नाही. दरम्यान, तिचे वडील कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी मजुरी करतात. मर्यादित आर्थिक संसाधने असूनही, हे कुटुंब आपल्या मुलाचे आरोग्य जपण्यासाठी सतत प्रयत्नशील आहे.स्थानिकांमध्ये चिंतेचे वातावरण कुटुंबियांच्या म्हणण्यानुसार, तुषारला सरकारी पोषण पुनर्वसन केंद्रात सुमारे १५ दिवस दाखल करण्यात आले होते आणि त्याला उपचार व विशेष काळजी पुरवण्यात आली. असे असूनही, त्याच्या पोषण स्थितीत अपेक्षेप्रमाणे सुधारणा झाली नाही. त्यामुळे स्थानिक लोकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाली आहे.

गंभीर वस्तुस्थिती समोर

उल्लेखनीय आहे की, राज्याच्या महिला व बाल विकास मंत्री, अदिती तटकरे यांनी अलीकडेच कुपोषण निर्मूलन आणि बाल आरोग्य कार्यक्रमांचा आढावा घेण्यासाठी मेळघाटला भेट दिली. असे असूनही, धारणी मुख्यालयाजवळील एका गावातील एक बाळ तीव्र कुपोषणाच्या चौथ्या श्रेणीत आहे, ही वस्तुस्थिती अनेक प्रश्ननिर्माण करते.

परिसरात आरोग्य सेवा, अंगणवाडी सेवा आणि इतर पोषण कार्यक्रम उपलब्ध असूनही मुलांची स्थिती इतकी गंभीर राहत असेल, तर प्रभावी या कार्यक्रमांच्या

अंमलबजावणीचा आढावा घेणे आवश्यक वाटते. स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की, अशा गंभीर प्रकरणांमध्ये नियमित आरोग्य तपासणी, पौष्टिक आहाराची उपलब्धता, कुटुंबाला योग्य मार्गदर्शन आणि विभागीय स्तरावर सतत देखरेख असणे अत्यंत आवश्यक आहे, जेणेकरून कुपोषणामुळे कोणत्याही मुलाला जीवनासाठी संघर्ष करावा लागणार नाही.

लआता गरज आहे की संबंधित विभागाने तुषारच्या आरोग्यावर बारकाईने लक्ष ठेवावे आणि त्याला आवश्यक वैद्यकीय सेवा, पोषण आणि इतर सर्व सुविधा वेळेवर पुरवाव्यात, जेणेकरून हे मूल लवकरच निरोगी जीवन जगू शकेल.


सांध्य मराठी दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
अमरावती येथून प्रकाशित
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
धन्यवाद वाचकांनो!
25 लाख वाचकांनी
आमच्या साईड ला भेट दिल्याबद्दल
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
मुख्य पृष्ठ
अमरावती
विदर्भ
महाराष्ट्र
देश-विदेश
ब्रेकिंग न्यूज
अमरावतीत विकासकामांचा धडाका
पावसाचा जोर वाढला
शेतकऱ्यांसाठी महत्वाची बातमी
राज्यातील राजकीय घडामोडी
क्रीडा क्षेत्रातील ताज्या बातम्या
HTTPS://E PAPER.VIDARBHAPRAJASATTAK.COM
आपल्या परिसरातील बातम्या व राज्यभरातील ताज्या घडामोडी
वाचा आता आमच्या सोबत
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
आमच्या चॅनल ला आजच जॉईन व्हा!
स्थानिक बातम्यांवर विशेष भर
राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व कृषी बातम्या
फोटो व व्हिडिओ सह अपडेट
तत्काळ व विश्वसनीय बातम्या
मो. 8605948853
Follow Us On :